# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.09.2023** **वार – शनिवार**

---

**पुणे फेस्टिवल**

पुण्याच्या सांस्कृतिक विश्वाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या पुणे फेस्टिवलचं उद्घाटन काल राज्याचे पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते झालं. गणेश कला क्रीडा रंगमंच इथं झालेल्या या कार्यक्रमाला राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री, पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. खासदार रजनी पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले, खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री सुरेश कलमाडी यांच्यासह इतर मान्यवरांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली. पुणे फेस्टिवलचं हे 35 वं वर्ष आहे. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यासाठी सार्वजनिक उत्सव महाराष्ट्रात रुजवला आणि लोकमान्यांचा हा विचार पुणे फेस्टिवलच्या माध्यमातून पुढं सुरू राहिला, असं प्रतिपादन पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी केलं. अभिनेत्री हेमामालिनी यांनी या कार्यक्रमात गणेशवंदना सादर केली. ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ पद्मविभूषण डॉ. के. एच. संचेती यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. तसंच संजय घोडावत समूहाचे अध्यक्ष संजय घोडावत यांना पुणे फेस्टिवल पुरस्कार देण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या उद्घाटन सोहळ्याचा प्रारंभ ज्येष्ठ सनईवादक तुकाराम दैठणकर यांच्या सनई वादनानं झाला. त्यानंतर अनेक सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

**आरोग्य वर्धिनी केंद्रं**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून समाविष्ट 34 गावांमध्ये 29 ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्रं सुरू करण्यात येणार आहे. या केंद्रांच्या माध्यमातून गर्भधारणा, बाळंतपणात घेण्याची काळजी, कुटुंब नियोजन, संसर्गजन्य आजार आणि बाह्यरुग्णांची देखभाल इत्यादी 14 सेवा पुरवण्यात येणआर असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या सहाय्य आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी दिली.

**रुबी हॉल**

रूबी हॉल रुग्णालयाच्या मूत्रपिंड प्रत्यारोपण परवान्याचं नूतनीकरण राज्य सरकारच्या आरोग्य विभागानं नुकतंच केलं आणि हृदय आणि यकृत प्रत्यारोपणाची परवानगी रुग्णालयाला देण्यात आली. रुग्णालयाचे सल्लागार अली दारूवाला यांनी ही माहिती दिली. राज्यातल्या धर्मादाय न्यासाच्या रुग्णालयांची राज्य आरोग्य विभागातर्फे नियमित तपासणी केली जाते. या प्रक्रियेचा भाग म्हणून

मंत्रालयाच्य 22 अधिकाऱ्यांच्या पथकानं रुबी हॉल रुग्णालयाला भेट देऊन सर्व परवानग्या आणि कागदपत्रांची तपासणी केली.

**बाह्य रुग्ण कक्ष**

बारामतीच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातल्या बाह्यरुग्ण कक्षाचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज झालं. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यविषयक सोयीसुविधा वेळेत आणि माफक दरात मिळाव्यात यासाठी राज्यातली आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असं प्रतिपादन त्यांनी या वेळी केलं. उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, अपर पोलिस अधीक्षक आनंद भोईटे, महावितरणचे मुख्य अभियंता सुनील पावडे यावेळी उपस्थित होते. यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी विविध विकास कामांची पाहणी केली.

**गणेश विसर्जन**

गणेशोत्सवाच्या दिवसांत पुणे शहर आणि परिसर स्वच्छ राहावा आणि संस्कृतीसोबतच निसर्गाचंही संवर्धन व्हावं, या हेतूनं यंदाही पुणे आणि परिसरात 200 पेक्षा जास्त कचरा वेचक 40 विविध विसर्जन घाटांवर निर्माल्य संकलन करणार आहेत. पुण्यातल्या स्वच्छ या संस्थेच्या वतीनं गेली 15 वर्षं हा उपक्रम राबवला जातो. यातून दरवर्षी 100 टनांपेक्षा जास्त निर्माल्य नदीत जाण्यापासून थांबवून संकलित केलं जातं आणि पुढं पुणे महापालिकेतर्फे खतनिर्मितीसाठी पाठवलं जातं.
पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीनं प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथकांसह सुसज्ज रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत.

**ध्वनी प्रदूषण**

सध्या सुरू असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पुण्यासह संपूर्ण राज्यभरातल्या प्रमुख शहरांमध्ये आवाजाची तीव्रता तपासण्यात येत आहे. पुण्यातल्या विविध 18 ठिकाणी यासाठीची यंत्रणा बसवण्यात आली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातल्या मंडई परिसरात आवाजाची तीव्रता सर्वात जास्त राहिल्याचं आढळून आलं आहे. रहिवासी भागात 50 ते 55 डेसिबलची ध्वनिमर्यादा निश्चित करण्यात आली असली, तरी सध्याच्या गणेशोत्सवात आवाजाची तीव्रता 80 ते 90 डेसिबलपर्यंत गेल्याचं समोर आलं आहे. आजपासून पुढचे सहा दिवस रात्री बारापर्यंत ध्वनिवर्धकांना परवानगी देणअयात आल्यानं ही पातळी आणखी वर जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेट विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**